MHRG190007232023

## :: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१७/२००६ मधील निशाणी क्र.३७ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला मुळ अर्जदारने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, मौजे बिजघर, ता.महाड, जि.रायगड येथील मिळकत नागेश्वरी लघुपाटबंधारे धरण प्रकल्पाकरिता दिनांक १६.०४.१९९९ रोजीच्या नोटीफिकेशनने संपादित करण्यात आली असुन त्याबाबत विशेष भूसंपादन अधिकारी यांनी जाहीर केलेल्या अवॉर्ड/निवाडापत्रकामध्ये आमचेपैकी नंबर १ ते ३ यांचे वडील श्री.सुरेश धोंडु पवार तसचे अर्जदारांपैकी अ.नं.४ व ५ यांची नावे हक्कदार व्यक्ती म्हणुन समाविष्ट केलेली आहेत. मे.विशेष भुसंपादन अधिकारी यांनी संपादित सर्वे नं.२३, हिस्सा नं.३, क्षेत्र ०–१८–० आर या मिळकतीस अत्यंत कमी नुकसान भरपाई जाहीर केल्याने त्यांचे चुलते वसंत धोंडु पवार व आजी आनंदी धोंडु पवार यांनी वाढीव नुकसान भरपाई मिळण्याकरिता प्रस्तुतचा

अर्ज दाखल केला असुन सदरचा अर्ज प्रलंबित आहे. त्यांचेपैकी आजी आनंदी धोंड्डु पवार या मयत आहेत.

०४. अर्जदाराचे पुढे असे कथन की, सदर संपादित मिळकतीमध्ये त्यांचा हिंदु वारसा कायदयाप्रमाणे हक्क असुन त्यांच्या नावाची अथवा पुर्वजांच्या नावाची नोंद सामनेवाले यांनी निवाडयामध्ये केलेली आहे. प्रस्तुतचा मुळ रेफरन्स अर्ज दाखल करताना मुळ अर्जदार वसंत धोंड्डु पवार यांच्या संपर्कात नसल्यामुळे अर्जदार म्हणुन सामील होऊ शकले नाही. वंशवेलीनुसार अर्जामध्ये हक्कहितसंबंधी व्यक्ती आहेत आणि त्यामुळे त्यांची नावेदेखील सदर रेफरन्स अर्जामध्ये अर्जदार सदरी सामील होऊन कायदयाप्रमाणे देय असलेला हिस्सा मिळावा याकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्जदार क्र.१ ते ३ यांची रेफरन्स अर्जातील अर्जदार सदरी अनुक्रमे ३/२, ३/३ व ३/४ आणि अ.क्र.५ व ६ यांना अनुक्रमे ४ व ५ अशा क्रमाने सामील करण्याची विनंती केली आहे.

०५. याउलट सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी तीव्र आक्षेप नोंदवुन योग्य ते न्यायाचे आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे परंतु मुळ अर्जातील अर्जदार यांनी सदरचा अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे.

०६. अर्ज उभयपक्षाच्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ अर्जदार यांनी

सदर अर्जास आक्षेप नोंदविलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच प्रकरणाचा टप्पा लक्षात घेता, प्रस्तावित मागणीस कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. प्रस्तावित मागणीबाबत अर्जदारास परवानगी दिल्यास अर्जदार व सामेनवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. विशेषतः मुळ अर्जदार यांनीच अर्जास आक्षेप नोंदविलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**:: आदेश ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.02 11:20:42 +0530

महाड,
दिनांकः०१.०१.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड